**मान्यताप्राप्त विद्यापीठांच्या पदवी /पदविका धारकांना संगणक अर्हता परीक्षेतून सूट देण्याबाबत.**

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांक मातंसं/नस्ती ०४/२२४ /३९,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ३० ऑक्टोबर, २००६

**वाचा :-** १) सा.प्र.वि, शासन निर्णय, क्रमांक मातंसं/नस्ती ०४/२२४/३९, दि.२६ मे, २००४
२) सा.प्र.वि, शासन निर्णय, क्रमांक. मातंसं/नस्ती ०४/१४/३९, दि. ८ जुलै, २००४
३) सा.प्र.वि, शासन निर्णय, क्रमांक.मातंसं/नस्ती ०४/२२४/३९, दि. ७ जुलै, २००५
४) सा.प्र.वि, शासन निर्णय, क्रमांक. मातंसं/नस्ती ०४/२२४/३९, दि. ९ जून, २००६

**प्रस्तावना :-**

शासन निर्णय क्रमांक मातंसं/नस्ती-०४/२२४/३९, दि. २६ मे,२००४ नुसार संगणक अर्हता परीक्षा व तद्नुषंगिक बाबींविषयी सर्वंकष धोरण ठरविण्यात आले असून शासकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांसाठी प्रस्तुत शासन निर्णयाच्या परिच्छेद क्रमांक १ मध्ये नमूद केलेल्या पर्यायांपैकी कुठलीही एक परीक्षा संगणक अर्हता परीक्षा म्हणून ग्राहय धरण्यात आली आहे. तसेच त्यामध्ये नमूद केलेल्या महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या सहा पदवी/पदविका/पदव्युत्तर पदविका उत्तीर्ण झालेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना संगणक अर्हता परिक्षा पुन्हा उत्तीर्ण करणे आवश्यक नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. याशिवाय मान्यताप्राप्त विद्यापिठांच्या -MCS, MCA, MSC(Computer), MCM(Computer), BCS, BSC(IT) इत्यादी व इतर संगणक विषयक पदवी /पदविका धारकांना संगणक अर्हता परीक्षा देण्यापासून सूट देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

***शासन निर्णय :-***

१. मान्यता प्राप्त विद्यापीठ / आयआयटीच्या खाली नमूद केलेल्या पदवी / पदव्युत्तर पदविका / पदविका धारकांना शासन निर्णय दिनांक २६.०५.२००४ नुसार शासकीय सेवकांसाठी ग्राह्य धरण्यात आलेली संगणक अर्हता परीक्षा पुन्हा उत्तीर्ण करणे आवश्यक राहणार नाही.

| पदवी / पदविका | अभ्यासक्रम | | | |
|---|---|---|---|---|
| 1. M.E./M.Tech | Computer | IT | Computer Science | Computer Technology |
| 2. B.E./B.Tech | Computer | IT | Computer Science | Computer Technology |
| 3. Diploma | Computer | IT | Computer Science | Computer Technology |

२. वरील अभ्यासक्रमांशिवाय मान्यता प्राप्त विद्यापीठ / आयआयटीच्या Post/Advance Diploma - ADCSSA, PGDCM, PGDCSA, PGDBA(System), PGDIT, ADIT या अर्हताप्राप्त व्यक्तिंनाही संगणक अर्हता परीक्षा पुन्हा उत्तीर्ण करणे आवश्यक रहाणार नाही.

३.  शासकीय सेवेत नव्याने नियुक्त होणाऱ्या वरील अर्हता धारण करणाऱ्या शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना संगणक अर्हता परीक्षा पुन्हा उत्तीर्ण करणे आवश्यक राहणार नाही.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(भ.प्र. सिंह)
संचालक (मातं) तथा सह सचिव,
महाराष्ट्र शासन

प्रति,

राज्यपाल यांचे सचिव,
मुख्यमंत्री यांचे सचिव,
उपमुख्यमंत्री यांचे सचिव,
सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव यांचे खाजगी सचिव,
शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव,
प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई
प्रबंधक, उच्च न्यायालय (अपिल शाखा), मुंबई,
प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुबई,
सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, मुंबई,
महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई,
महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, नागपूर,
महालेखापाल-१ (लेखा परीक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई,
महालेखापाल-२ (लेखा परीक्षा) महाराष्ट्र, नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई / वांद्रे (पूर्व), मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
सर्व पोलीस आयुक्त,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व महानगरपालिकांचे आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषद / नगरपालिकांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व नगरपरिषदांचे मुख्याधिकारी,
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित, पहिला मजला, व्यवसाय शिक्षण प्रशिक्षण इमारत,
सर्व मंत्रालयीन विभाग,
सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई,
मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती (२ प्रती).

******

एच–1666 –1अ.